


दिग्दर्शक मधु भागले आणि नाटककार दत्ता खेबूडकर

• • • 'वेध'ची वेधक दृश्ये • • •

प्रकाशक चंद्रकांत घाटगे, वितरक मानसिंग [illegible] आणि
अध्यक्ष शिवलिंगअण्णा भेंड [illegible]-प्रसंगी





महाराष्ट्र राज्याच्या सातव्या प्रादेशिक नाट्यस्पर्धेत
सांगली केंद्रामध्यें पहिलें पारितोषिक रुपये पांचशेहे
मिळालेलें संगीत सामाजिक समस्यापूर्ण नाटक

☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆

# वेध

लेखक

**दत्ता खेबूडकर**

PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN THEATRE
Date...
ESTD. 1981

☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆

चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर
एका प्रतीस मूल्य केवळ रुपये दोन

तस मी गे
नम्र माझें
तम्बुजीं या
उद्धराया

केवळ
करण्यासाठीं
काडं करून
मोल दिलं
त्या माझ्या
यस्मृतीस

दि. १७ डिसेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या सातव्या नाटयस्पर्धेच्या निमित्तानें सांगली येथील जनता नाटयगृहांत या नाटकाचा प्रथम प्रयोग सादर केला जाऊन त्याला पांचशेहे रुपयांचें पहिलें बक्षीस मिळाले.

## यशवंतांचा श्रेयफलक

| | | |
|---|---|---|
| डॉ. मोहन | : | मुरलीधर महामुनी |
| सदानंद | : | श्रीकांत जोशी |
| जज्जसाहेब | : | अरुण सरनाईक |
| मदन | : | अरुण सरनाईक |
| शोभा | : | इंदू अष्टेकर |
| छाया | : | सुलभा संकेश्वरकर |
| अंजू | : | बेबी सुरेखा जोशी |

दिग्दर्शक
**मधू भोसले**
संगीत
**शाम जाधव**
पद्य-रचना
**जगदीश खेबूडकर**
रंगभूषा
**गणपत पाटील**
निर्मिति-प्रमुख
**डॉ. एस्. ए. कामत**

# १

[ मुंबई शहरांतील एका रिटायर्ड सिव्हिल जज्जाचे बंगल्यांतील एक प्रशस्त दिवाणखाना. दिवाणखान्यांतील तिन्ही बाजूंस तीन दरवाजे आहेत. मध्यभागीं असलेल्या दारांतून बाहेरील पोर्चचा कांहीं भाग दिसूं शकतो आहे. तसेंच, त्या दरवाज्यांतून बाहेरील बाजूस पोर्चमधून परस्पर माडीवर जाण्यासाठीं असलेला जिना अर्धवट दिसूं शकतो आहे. डाव्या बाजूचे दार जज्जसाहेबांच्या खोलीचें असून उजव्या बाजूचें दार जज्जसाहेबांकडे रहाणाऱ्या हाऊस-सर्जनच्या खोलीचें आहे. जज्जसाहेबांच्या पेशाला शोभेल असें फर्निचर व्यवस्थितपणें मांडण्यांत आलें आहे. कोपऱ्यांत रेडिओचा स्टँट आहे. भिंतीवर मोठीं चार निसर्गचित्रें लटकवलेलीं आहेत. कोपऱ्यांत असलेल्या एका लहानशा टेबलावर नुकतेंच पुरें झालेलें एक निसर्गचित्र व पेंटिंगचें सर्व साहित्य कांहींसें अस्ताव्यस्त पडलेलें आहे. एकंदर सजावटीवरून वैभवाबरोबरच कलात्मक दृष्टि स्पष्टपणें दिसते आहे.

वेळ सकाळीं ७–५० ची आहे. पडदा उघडतो त्यावेळीं दिवाण-खान्यांत कोणीच नाहीं. प्रथम हाऊस-सर्जनच्या खोलींतून पांढरा स्वच्छ गणवेष परिधान केलेला एक नोकर कांचेची किटली, कप-बशी व दोन डिशीस व कांटा चमचा वगैरे असलेला ट्रे घेऊन माडीवर जातो. थोडयाच वेळांत हाऊस-सर्जन श्री. मोहन देशपांडे तोंड रुमालानें टिपीत खोलीच्या दारांतून प्रवेश करतो. तो साडे-पांच फूट उंचीचा गोरा देखणा २९ वर्षांचा तरुण आहे. त्यानें अद्याप रात्रीचा वेष बदललेला नाहीं. तो फणीने आपले केस साफ-सूफ करतो नि गळयांत अडकवलेल्या स्टेथॉस्कोपशीं चाळा करीत रेडिओ लावतो. सहजपणें टेबलावरील वर्तमानपत्र उचलून वाचतो. सिगारेटचे दोन झुरके मारतो. रेडिओवरील गाणें संपतां-संपतांच

रस्त्यावर कोणी इसम टॅक्सीखालीं सांपडल्यामुळें आरडाओरडा होतो, गॅलरींतूनच मोहन डोकावतो व परत येऊन. ]

**मोहन** : हंऽऽ, धिस इज बॉम्बे ! ( पुन्हां वर्तमानपत्र वाचतां वाचतां ) ओ, वंडरफुल, गाईच्या शेणापासून दिवे लावण्याचा शोध लावल्यामुळें डॉक्टरेटची पदवी मिळाली. माय गॉड ! ( वर्तमानपत्र टाकून देतो व घड्याळाकडे पाहून ) अरे हो, आठ वाजायला आलेच कीं ! ( जज्ज साहेबांच्या खोलींत प्रवेश करणार, एवढ्यांत सदानंद प्रवेश करतो. तो पोर्चमधून येतो. त्यानें वय ३६ वर्षांचें आहे. तो सशक्त असून त्यानें डोळ्यांवर गोल्डन फ्रेमचा चष्मा घातलेला आहे. त्याने दुटांगी धोतर व कोट असा वेष परिधान केलेला आहे. )

**सदानंद** : ( मोहनला पाठमोरा पाहून छद्मीपणानें ) दिवाडकर जज्जांचा बंगला हाच ना ?

**मोहन** : ( मागें वळून आश्चर्यानें ) सदानंद, अरे तूं कसा इकडे ?

**सदा०** : भले शाबास, छान; म्हणजे चोराच्या उलट्या म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

**मोहन** : म्हणजे ? अरे, काय झालं तरी काय ?

**सदा०** : काय झालं ? मेहेरबान, तारीख पाहिलीत का कॅलेन्डरवरची ?

**मोहन** : हो, आठ ऑगस्ट.

**सदा०** : हो, आठ ऑगस्ट ! म्हटलं पुणं सोडून आपल्याला आज सात दिवस आणि आठ रात्री उलटून गेल्या आहेत. महाशय, काय विचार आहे आपला. आपण बजरंग छाप बालब्रह्मचारी डॉक्टर नसून आपल्या नाजुक तब्येतीची काळजी करणारी कुणी साजुक माणसं आपल्या पाठी-मागं आहेत याची आठवण आहे ना ? कीं डसला आहांत कायमचेच मुंबईला ? नाहीं, म्हणजे मुंबईच्या सगळ्याच वर्तमानपत्रांतून सध्यां तरुण पोरींना पळवून नेल्याच्या बातम्याऐवजीं तरुण पुरुषांनाच पळवून नेल्याच्या बातम्या दररोज छापून यायला लागल्या आहेत—म्हणून म्हटलं!

**मोहन** : अरे पण...



**सदा०** : ( त्याला पुढें बोलूं न देतां ) आणि शिवाय ती 'शॉर्ट टर्म कंपॅनियन्' ची अगदीं लेटेस्ट कल्पना निघाली आहे हल्लीं मुंबईंत !

**मोहन** : शार्ट टर्म कंपॅनियन् ! ही काय भानगड आहे बुवा ?

**सदा०** : अरे, म्हणजे दोन तासांपुरता दोस्त; अरे चौपाटीवर भेळ खाण्यासाठीं म्हणून सहज गेलं असतांना सुद्धां, अगदीं खिशातल्या फौंटनपेनची चोरी करावी ना, इतक्या सहजतेनं हृदयाची चोरी केली जाते म्हणे; आणि तास, दोन तास समुद्रावरचा खारा वारा पिऊन झाला म्हणजे ट्राममधून परत जातांना तो चोरीचा मुद्देमाल 'टाटा' म्हणून तितक्याच सफाईनं परतहि केला जातो म्हणे ! ! असंतलं कांहीं झालं नाहीं ना तुझं ? ( वाक्प्रचारांनीं घायाळ होऊन कोचांत पडलेल्या मोहनला गदगदां हालवीत ) अरे, काय ? झालं काय तुला ?

**मोहन** : संपल तुझं ? कीं आहे अजूनी ? असेल तर बोलून घे.

**सदा०** : छान, आतां यांत काय बोललों बुवा मी ?

**मोहन** : छे छे; कांहीं नाहीं; अगदींच कांहीं नाहीं. अरे, आतांच तर पहिला हात झालाय्, आतां दुसरा हात एकदां घ्याना फिरवून, म्हणजे चांगली घोटून केल्यासारखी होईल.

**सदा०** : अस्सं, म्हणजे तुला थट्टा सुचते आहे काय ? पण लेका, अरे गेल्या आठ दिवसांतली तुझ्या सती पार्वतीची विरहावस्था तुला ऐकवली तर तूं नुसताच घायाळ होणार नाहींस, तर तूं बेशुद्ध होऊन तुझी दांत-खिळी बसल्याशिवाय रहाणार नाहीं.

**मोहन** : अरे, पण आठ दिवसांत एवढं झालं काय आकाश कोसळण्या-सारखं ! ( हंसतो. )

**सदा०** : मूर्ख आहेस तूं. कल्पना नाहीं तुला वहिनींच्या प्रेमाची. मोहन, दोन दिवसांनीं एकदां म्हटलं तरी एव्हाना चार फेऱ्या व्हायच्या तुझ्या पुण्याला. अरे, तुझी पहिली फेरी चुकली तोंवर स्वस्थ होत्या वहिनी. पण पांच दिवस झाले, सहा झाले, सात झाले आणि आठवा दिवस उजाडला तरी सुद्धां तुझा पत्ता नाहीं. असं पाहिल्यावर त्यांनीं अगदीं अन्नच सोडलं ! अरे, आज मी येतांना जेव्हां तुला घेतल्याशिवाय परत

येतच नाहीं असं सांगून आलों ना, तेव्हां कुठं तोंडांत पाणी घेतलं त्यांनीं.

**मोहन** : बरोबर आहे; एका कारकुनाची बायको होण्याचं नशीब पत्करून छाया माझ्या घरांत आली असतांना, एका डॉक्टरची बायको होण्याचं भाग्य आपल्याला लाभलं, म्हणून केवढं कौतुक वाटतं तिला. मी डॉक्टर झाल्यापासून तर ती माझी अगदीं कुकुल्या पोरासारखी काळजी घेते.

**सदा०** : आणि हें कुकुलं पोर असं इकडं हुदड्या घालतंय् ! (मोहन हंसतो) हंसतोस काय लेका ! अरे, घाबरून जाऊन त्यांनीं काल मदनला सुद्धां पत्र लिहिलंय्.

**मोहन** : काय म्हणून ?

**सदा०** : काय म्हणून ! (मिष्किलपणें अर्धवट नक्कल करीत) कीं बंधुराज, तुम्ही मुंबईतच आहांत तेव्हां आमच्या इकडचं येणं गेल्या आठ दिवसांत कां झालं नाहीं याची चौकशी करा. अंथरूण तर नाहीं ना धालणं झालं इकडून.

**मोहन** : कमाल आहे बुवा !

**सदा०** : कमाल ? अरे, मी सुद्धां येण्याबिण्याच्या भानगडींत पडणार नव्हतों. उद्यांचा दिवस वाट पाहून साऱ्या वर्तमानपत्रांतून बोंबाबोंब करून टाकणार होतों.

**मोहन** : काय, बोंबाबोंब ?

**सदा०** : होय, बोंबाबोंब ! अरे, फुलसाईज ब्लॉक देणार होतों तुझा अगदीं फ्रन्ट पेजवर, आणि त्याच्याखालीं......

**मोहन** : हं बोला, थांबलांत कां ?

**सदा०** : एक गोंडस तरुण डॉक्टर चोरीस गेला आहे, जसाच्या तसा परत करणाऱ्यास इनाम रुपये दहा हजार.

**मोहन** : गेलास, शेवटीं जातीवर गेलास.

**सदा०** : म्हणजे, यांत जातीचा काय संबंध बुवा !

**मोहन** : काय संबंध ?– धंदा कोणता तुझा ?

**सदा०** : धंदा पत्रकाराचा.



**मोहन** : हो– म्हणजे हाच. (हजाम अशा अर्थानें अभिनय करीत.)

**सदा०** : हजामाचा ?

**मोहन** : नाहींतर काय ?

**सदा०** : तें कसं काय, बुवा !

**मोहन** : अरे, फरक काय आहे दोघांत ? ते जें करतात तेंच तुम्ही करतां! ते कधीं कधीं गळा कापतात, तुम्ही नेहमींच गळे कापतां. फरक इतकाच, कीं ते गळ्याचे केस कापतात आणि तुम्ही केसानं साफ गळाच कापून टाकतां ! (दोघेही हंसतात.)

**सदा०** : बरं, ए, थट्टा पुरे कर.

**मोहन** : शाबास, म्हणजे मीच थट्टा करतोय् म्हण कीं आणि तूं काय चेष्टा करतोयस काय ?

**सदा०** : बरं, आपण दोघंही थट्टा करतो आहोंत, मग तर झालं. बाकी वहिनी म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

**मोहन** : काय म्हणतात ?

**सदा०** : कीं तुम्ही दोघं एकत्र जमला आणि तुमच्या गप्पा सुरू झाल्या म्हणजे तुम्हांला वेळेचं भानसुद्धां रहात नाहीं. तिसऱ्या माणसानं अगदीं खुशाल एक झोप सुद्धां काढावी......(दोघे हंसतात) अरे हो मोहन, एक सांगायचं राहिलं.

**मोहन** : काय रे ?

**सदा०** : अरे, तो आपला राजा शिर्के...फौजदार रे !

**मोहन** : मग, काय झालं त्याचं ?

**सदा०** : झालं नाहीं कांहीं; पण त्याची पुण्याला बदली झाली आहे परत. (खालच्या आवाजांत) आणि काय रे, त्याचं लग्न झालं होतं ना ?

**मोहन** : होय तर; अरे, तो नाटक्या टगे आहे ना ?

**सदा०** : टगे...हां...हां, आलं लक्षांत; म्हणजे ज्याच्या बापरपणजोबानं आपल्या आडनांवांतला 'घा' च घालवून दिल्यामुळं आपलं हें आडनांव शिल्लक राहिलं असं सांगत होता तो टगे...होय ना ?

**मोहन** : बस, बस, बस; तोच तो. अरे, त्याची बहीणच त्या राजा शिर्केला दिली होती.